# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/01/2024 (गुरूवार) सकाळ

## अवैधरीत्या देशी दारुची
## वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध
## स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

पो.स्टे. नरखेड :— अंतर्गत मोहगाव रोड नरखेड येथे दिनांक ११/०१/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, ना.ग्रा पथक यांना गुप्त माहिती मिळाली की, एक इसम अवैधरित्या मोहगाव रोड नरखेड येथे एक ज्युपिटर मोटरसायकल क्र. MH 40-CG-9621 वर देशी दारूची वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेतील पथकाने घटनास्थळी जावुन नाकाबंदी करून ज्युपिटर मोटरसायकल क्र. MH 40-CG-9621 ला थांबवून चेक केले असता **आरोपी नामे— देवेंद्र नामदेवरावजी कावडकर, वय २९ वर्ष, रा. तिष्टी बु त. कळमेश्वर. जि. नागपूर** हा विनापरवाना व अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीकडुन ९२ देशी दारू निपा १८० एम. एल प्रमाणे प्रत्येकी ७०/—रु प्रमाणे असा एकूण ६४४०/— रु. व एक ज्युपिटर मो. सा. क्र. MH 40/CG- 9621 किंमती ४०,०००/—रुपये असा एकूण ४६,४४०/—रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ६५ (ई) (अ) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. जप्त मुद्देमाल व कागदपत्रे पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे नरखेड यांचे ताब्यात देण्यात आले. आरोपीला सुचनापत्रावर रिहा करण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहायक फौजदार चंद्रशेखर घडेकर, पोलीस हवालदार प्रमोद तभाने, रणजित जाधव यांचे पथकाने केली.




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर